## फिर्याद

जिल्हापेठ पो.स्टे.
दिनांक १८.०२.२०२४

**मी साईनाथ किशोर पाटील, वय—३० वर्षे, व्यवसाय— नोकरी, रा.प्लॉट नं.३६, व्यंकटेश कॉलनी, गोदावरी पिठाचे गिरणीजवळ, जिल्हाधिकारी निवासस्थानाचे पाठीमागे,जळगाव. मो.नं. ९८९०९६१७६६.**

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी परिवारासह राहतो व खाजगी नोकरी करतो. माझे आजोबा कै.पौलाद पाटील यांचे नावे व्यंकटेश कॉलनीत असलेल्या प्लॉटवर वारस लावण्याचे, हक्कसोड करण्याचे व कर्जाचा बोजाची नोंदी लावुन देण्याच्या कामाची चौकशी करण्यासाठी दि.०५.०२.२०२५ रोजी जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयात गेलो होतो. तेव्हा माझी तेथे संगणकावर बसुन काम करणारे अविनाश सनंसे यांचे सोबत भेट झाली. त्यांनी स्वत:ची ओळख डेटा एंन्ट्री ऑपरेटर अशी करुन दिली होती. तेव्हा मी सनंसे यांचेकडे वर प्रमाणेच्या कामासाठी चौकशी केली असता त्यांनी मला अर्ज व कागदपत्रे जोडुन ती सदर कार्यालयातील आवक जावक शाखेत जमा करण्यांस सांगुन, सदरचे काम नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील साहेबांकडुन करुन आणुन देण्यासाठी स्वत:साठी माझेकडे १५००/—रुपये व इतर नोंदी घेण्यासाठी देखील पैसे द्यावे लागतील असे सांगीतले होते. तेव्हा ते माझेकडे लाच रक्कमेची मागणी करत असल्याचे माझे लक्षात आले होते.

त्यानंतर मी माझे वर नमुद काम करुन देणे संदर्भात अर्ज तयार करुन त्या सोबत योग्य ती कागदपत्रे जोडुन सदरचे प्रकरण हे दि.०६.०२.२०२५ रोजी माझा भाऊ आनंद पाटील यांचे मार्फतीने जळगाव नगर भुमपान अधिकारी कार्यालय येथे आवक—जावक शाखेत दाखल केले होते. त्यानंतर दि.१५.०२.२०२५ रोजी मी अविनाश सनंसे यांना माझे कामाची विचारपुस करण्यासाठी फोन केला होता. परंतु मी त्यांचे मागणी प्रमाणे त्यांना १५००/—रुपये दिले नाही म्हणून त्यांनी माझे काम करण्यास नकार दिला होता. तेव्हा जो पर्यत मी त्यांना त्यांचे मागणी प्रमाणे १५००/—रुपये लाच रक्कम देणार नाहीत तो पर्यत ते नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील साहेबांकडुन माझे काम करुन आणुन देणार नाही असे माझे लक्षात आले होते. म्हणुन दि.१७.०२.२०२५ रोजी मी पुन्हा जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयात जावुन अविनाश संनसे यांची माझे प्रलंबीत कामा संदर्भात भेट घेतली असता त्यांनी मला दि.१८.०२.२०२५ रोजी येण्यास सांगीतले होते. अशा प्रकारे अविनाश सनंसे हे माझे वर नमुद प्रमाणेचे प्रलंबीत काम नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील साहेबांकडुन करुन आणुन देण्याचे मोबदल्यात त्यांना पैसे द्यावे लागतील असे सांगुन स्वत:साठी १५००/—रुपयांची मागणी करुन, फिरवा फिरव करत असल्याने सदर लाचमागणी प्रकरणी मी दि.१८.०२.२०२५ रोजी पोलीस निरीक्षक स्मिता नवघरे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जळगाव यांचेकडे तक्रार लिहुन दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी करण्यासाठी पोलीस निरीक्षक नवघरे यांनी मला व पंच श्रीमती कविता पाटील यांना आवश्यक त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर चालु करून, ते माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन देवुन, मला व पंच श्रीमती कविता पाटील यांना माझे कडील मोटर सायकलने बहिणाबाई उद्यान जळगाव येथुन अविनाश सनंसे यांची भेट घेण्यासाठी जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयात पाठविले होते. त्याप्रमाणे मी व पंच श्रीमती कविता पाटील अशांनी सदर ठिकाणी जावुन अविनाश सनंसे यांची भेट घेतली. तेव्हा आमच्यात माझे आजोबा कै.पौलाद पाटील यांचे नावे व्यंकटेश कॉलनीत असलेल्या प्लॉटवर वारस लावण्याचे, हक्कसोड करण्याचे व कर्जाच्या बोजाची नोंदी लावुन देण्याच्या कामा संदर्भात चर्चा झाली. सदर चर्चे

जिल्हापेठ पो.स्टे. CCTNS गुरनं. 38/2025 भ्र.प्र.अ. 1988 चे क. 7(अ) प्रमाणे दि. ता. 45 22.47 वा. दाखल आहे.

पोलीस ठाणे अंमलदार जिल्हापेठ पो.स्टे जळगांव

दरम्यान अविनाश सनंसे यांनी मोठे काम आहे, एका नोंदीचे कमीतकमी ४ ते ५ हजार घेतात, १—२ कमी करतील, ते दुसरे साहेब, फिरवतात त्यापेक्षा पैसे देवुन करुन घ्या असे सांगुन, माझेजवळ सदरच्या तिन्ही नोंदी लावुन देण्याचे काम करुन देणाऱ्या साहेबांसाठी प्रत्येक नोंदीचे ४ ते ५ हजार प्रमाणे १५०००/—रुपये मागुन व सदरचे काम सुरु करण्यासाठी स्वत:करिता १५००/— रुपये लाच रकमेची मागणी करुन, त्यापैकी १०००/—रुपये घेण्याचे मान्य केले होते. तेव्हा मी त्यांना थोडया वेळात पैसे आणुन देतो असे सांगुन पंच श्रीमती कविता पाटील यांचेसह सापळा पथका जवळ परत आलो. व घडलेली हकीकत सापळा पथकास सांगितली. त्यानंतर सापळा पथकाने माझे व अविनाश सनंसे यांचेमधील संभाषण ऐकुण लाच मागणी बाबत खात्री केली होती.

त्यानंतर पोलीस निरीक्षक नवघरे मॅडम यांनी मला,पंच श्रीमती कविता पाटील व सापळा पथकास पुढील सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यांचे सांगणे प्रमाणे मी अविनाश सनंसे यांना देण्यासाठी १०००/—रुपये (त्यात ५०० रुपये दराच्या ०२ नोटा) सापळा पथकाकडे दिल्या. पंचासमक्ष सदर नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेण्यात आले. व सदर नोटांना ॲंथ्रासिन पावडर लावुन, त्या माझ्या शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन देण्यात आल्या.

त्यानंतर पोलीस निरीक्षक नवघरे मॅडम यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकॉर्डर चालु करून, माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन देण्यात आले. त्यानंतर त्यांनी मला व पंच श्रीमती कविता पाटील अशांना माझे मोटर सायकलने अविनाश सनंसे यांची भेट घेण्यासाठी जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयात पाठवले होते. त्याप्रमाणे आम्ही सदर ठिकाणी जावुन अविनाश सनंसे यांची भेट घेतली. तेव्हा त्यांचेत व माझेत माझे कामा संदर्भात चर्चा झाली. तेव्हा त्यांनी माझेकडे माझे कामाचे संदर्भातील कागदपत्रांची झेरॉक्स मागीतली. त्यानंतर मी त्यांना एवढे खुप जास्त होता असे म्हणालो. तेव्हा त्यांनी मला तुम्हाला वाटत असेल मी मध्यस्ती काही करतोय त्याच्यात तर तम्ही डायरेक्ट सरांशी बोलु शकतात, मी जो आकडा सांगतो आहे हमखास ते याच्यापेक्षा जास्त सांगतील असे म्हणाले. तेव्हा मी बोलत बोलत त्यांचे सोबत सदर कार्यालयाचे बाहेर आलो व त्यांना तुम्ही सांगीतले तेवढे १०००/—रुपये आणले आहे असे बोलुन माझे शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यातुन १०००/—रुपये लाच रक्कम काढुन त्यांना दिली. सदरची लाच रक्कम त्यांनी त्यांचे हातात धरुन ठेवली. त्यानंतर मी ठरल्याप्रमाणे माझे डोळयावरिल चष्मा काढुन सापळा पथकास लाच रक्कम स्विकारले बाबत ईशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने अविनाश सनंसे यांना जागीच लाच रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले होते. तसा संपुर्ण सापळा कार्यवाहीचा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दि.१८.०२.२०२५ रोजी अविनाश सदाशीव सनंसे,वय ४९ वर्षे, रा.प्लॉट नं.५८,शास्त्री नगर, (रामानंद नगर) जळगाव यांनी माझे आजोबा कै.पौलाद पाटील यांचे नावे व्यंकटेश कॉलनीत असलेल्या प्लॉटवर वारस लावण्याचे, हक्कसोड करण्याचे व कर्जाचा बोजाची तिन्ही नोंदी जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील साहेबांकडुन लावुन आणुन देण्याच्या मोबदल्यात त्यांचेकरिता प्रत्येक नोंदीचे ५०००/—रुपये प्रमाणे १५०००/—रुपयांची मागणी करुन सदरचे काम सुरु करण्यासाठी स्वत:करिता १५००/— रुपये लाच रकमेची मागणी केली. त्यापैकी १०००/—रुपये लाच रक्कम आज दि.१८.०२.२०२५ रोजी १७.३० वा.चे सुमारास जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयाबाहेर पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन माझी फिर्याद आहे.

**समक्ष**

**स्मिता नवघरे**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**जळगांव**

**ही फिर्याद दिली,**
**सही,दि.१८.०२.२०२५**

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** जिल्हापेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0038 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**18/02/2025 22:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 18/02/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/02/2025

**Time From (वेळेपासून):** 17:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/02/2025 **Time (वेळ):** 22:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 045

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/02/2025 22:47 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगर भुमापन अधिकारी,कार्यालया बाहेर जळगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): साईनाथ किशोर पाटील

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1995

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 36,व्यंकटेश कलनी, गोदावरी पीठाचे ,गिरणीजवळ,जिल्हाधिकारी , निवासस्थानाचे पाठीमागे जळगाव,जिल्हापेठ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 36,व्यंकटेश कलनी, गोदावरी पीठाचे ,गिरणीजवळ,जिल्हाधिकारी , निवासस्थानाचे पाठीमागे जळगाव,जिल्हापेठ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9890961766

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अविनाश सदाशिव सनंसे | | | 1. 58,शास्त्री नगर रामानंद नगर , जळगाव,जिल्हापेठ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

यातील फिर्यादी याने त्याचे आजोबा कै. पौलाद पाटील यांचे नावे व्यंकटेश कॉलनीत असलेल्या प्लॉटवर वारस लावण्याचे हक्कसोड करण्याचे व कर्जाच्या बोजाची नोंदी सिटी सर्वेच्या उताऱ्यावर लावुन पाहिजे होत्या सदर कामाची चौकशी करण्यासाठी फिर्यादी हे दि.05/02/2025 रोजी जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयात गेले होते तेव्हा त्यांची तेथे संगणकावर बसुन काम करणारे आरोपी खाजगी इसम अविनाश सनंसे यांचेशी भेट झाली त्यांनी फिर्यादीस स्वत:ची ओळख डेटा एंट्री ऑपरेटर अशी करुन दिली होती. त्यानंतर फिर्यादी यांनी त्यांचे कामा संदर्भात खाजगी इसम सनंसे यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी फिर्यादीस अर्ज व त्यासोबत कागदपत्रे जोडुन ती सदर कार्यालयातील आवक जावक शाखेत जमा करण्यास सांगुन सदरचे काम नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील साहेबांकडुन करुन आणुन देण्यासाठी स्वत: साठी फिर्यादीकडेस 1500/- रुपये व इतर नोंदी घेण्यासाठी देखील पैसे द्यावे लागतील असे सांगितले होते.

त्याप्रमाणे दि.06/02/2025 रोजी फिर्यादी यांनी त्यांचा अर्ज व त्यासोबत कागदपत्रे जोडुन ती सदरचे कागदपत्रे ही त्यांचा भाऊ आनंद पाटील यांचे मार्फतीने जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील आवक जावक शाखेत दिले होते. त्यानंतर फिर्यादी यांनी दि.15/02/2025 रोजी त्यांचे कामासंदर्भात खाजगी इसम सनंसे यास विचारपुस करण्यासाठी फोन केला होता. परंतु फिर्यादी यांनी त्यांना 1500/- रुपये दिले ना/ही म्हणुन त्यांनी फिर्यादीचे काम करण्यास नकार दिला होता. सदर लाच मागणी प्रकाराबाबत फिर्यादी यांनी दि.18/02/2025 रोजी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळापथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर तक्रारीची दि.18/02/2025 रोजी ला.प्र.वि.जळगाव येथील सापळापथकाने पडताळणी केली असता आरोपी खाजगी इसम सनंसे यांनी फिर्यादी यांचे आजोबा कै. पौलाद पाटील यांचे नावे व्यंकटेश कॉलनीत असलेल्या प्लॉटवर वारस लावण्याचे, हक्कसोड करण्याचे व कर्जाच्या बोजाची नोंद अशा तिन प्रकारच्या नोंदी लावण्याचे काम जळगाव नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील साहेबांकडुन करुन आणुन देण्याचे मोबदल्यात त्यांचे करीता प्रत्येक नोंदीचे 5000/- रुपये प्रमाणे 15,000/- रुपये लाच मागुन कामाची सुरवात करण्यासाठी स्वत: करीता 1500/- रुपये लाच रकमेची मागणी करुन त्यापैकी 1000/- रुपये लाच रक्कम स्वत:आज रोजी 17.30 वाजेच्या सुमारास जळगाव नगर भुमापन कार्यालयात पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा. सोबत टंकलिखित केलेली फिर्याद जोडली आहे.